पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ७८१ दिनांक - ०२/११/२०२३**

वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर

## चोरीचे १२ लॅपटॉप,०७ लॅपटॉप चार्जर,०१ सोनी कंपनीचा कॅमेरा व ०२ दुचाकी केले जप्त

उच्चशिक्षित गुन्हेगाराकडून एकुन १२ लॅपटॉप,०७ लॅपटॉप चार्जर,०१ सोनी कंपनीचा कॅमेरा, ०२ दुचाकी जप्त करुन पुणे शहर तसेच महाड शहर पोलीस स्टेशन जिल्हा रायगड व मानगाव पोलीस स्टेशन जिल्हा रायगड येथील एकुन०८गुन्हे उघडकीस आणुन एकुन ६,४४,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर हद्दीमध्ये कॉलेज परिसरातील बिल्डींग/हॉस्टेलमध्ये प्रवेश करुन विद्यार्थ्यांनी बुट अथवा दरवाजाजवळ ठेवलेली चावी वापरुन विद्यार्थ्यांचे रुममध्येच चार्जिंगला लावलेले किंवा रुममध्ये ठेवलेले लॅपटॉप चोरीचे प्रकार घडत असल्याने वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गुन्हा रजि नंबर ४५२/२०२३ भादवि कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल होता.

अशा प्रकारे वारंवार घडणाऱ्या गुन्ह्यांचा अभ्यास करुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुनिल जैतापुरकर व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.अजय कुलकर्णी यांनी तपास पथकातील अधिकारी श्री.नरेंद्र मुंढे यांना लॅपटॉप चोरीचे गुन्हे उघडकीस आणने बाबत योग्य त्या सुचना देवून कर्वेनगर कॉलेज परिसरात तपास पथकातील अंमलदार यांना पेट्रालिंग करणेबाबत व सापळा लावून कारवाई करनेबाबत सुचना दिल्या होत्या.त्याअनुषंगाने तपास पथकाचे अधिकारी नरेंद्र मुंढे व तपास पथकातील स्टाफ पोलीस असे दिनांक ३१/१०/२०२३ रोजी **वारजे माळवाडी पोलीस ठाणे गुरनं ४५२/२०२३ भादंवि कलम ३८०** मधील घटनास्थळावरील तसेच आजुबाजुचे परीसरातील प्राप्त फुटेज मधील लॅपटॉप चोरी करण्याऱ्या संशयित इसमाचा शोध घेत असताना पोउपनिरी मुंढे यांनी तांत्रिक विश्लेषण करुन व गोपनीय बातमीदाराने दिलेल्या बातमीवरुन सापळा लावून नमूद स्टाफसह फुटेज मधील इसम नामे **अर्जुन तुकाराम झाडे, वय-२२ वर्षे** यास त्याचे राहते रुम मधून ताब्यात घेवून त्याचेकडे रुममध्ये मिळुन आलेल्या लॅपटॉप बाबत विचारपूस केली असता तो उडवा-उडवीची व असमाधानकारक उत्तरे देवू लागला.

मिळुन आलेल्या लॅपटॉपची पाहणी केली असता नमूद गुन्ह्यातील चोरीसगेले लॅपटॉप त्याचेकडे मिळुन आल्याने सदरचा गुन्हा त्यानेकेल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर त्यास अधिक तपासकामी अटक करुन त्यास विश्वासात घेवून त्याचेकडे अधिक तपास केला असता त्याने पुणे शहरातील वारजे,कर्वेनगर, भारती विद्यापीठ,सिंहगड रोड या परीसरातून लॅपटॉप चोरी केले असल्याची तसेच तो यापुर्वी महाड रायगड येथे शिक्षणासाठी असताना त्याने महाड व मानगाव येथे दोन दुचाकी चोरी केली असल्याची कबुली दिली. नमूद आरोपीची मा.न्यायालयाकडून पोलीस कोठडीची रिमांड घेवून आरोपीकडून वेगवेगळ्या कंपनीचे एकुन १२ लॅपटॉप, ०७ लॅपटॉप चार्जर, ०१ सोनी कंपनीचा कॅमेरा, ०१ हेडफोन, ०२ दुचाकी असा एकुन ६,४४,०००/- रु.किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असून नमूद गुन्ह्याचा पुढील तपास पो.उपनिरी श्री नरेंद्र मुंढे हे करीत आहेत.

आरोपीकडे आता पर्यंत झाले तपासात खालील गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र. | गुन्हा. रजि. व कलम | पोलीस ठाणे | मुद्देमाल |
|---|---|---|---|
| ०१ | ४५२/२०२३ भादवि कलम ३८० | वारजे माळवाडी पो.स्टेशन | ३ लॅपटॉप |
| ०२ | ३६५/२०२३ भादवि कलम ३८० | वारजे माळवाडी पो.स्टेशन | २ लॅपटॉप |
| ०३ | २१९/२०२३ भादवि कलम ३८० | वारजे माळवाडी पो.स्टेशन | २ लॅपटॉप |
| ०४ | ६२०/२०२३ भादविकलम ३८० | भारती विद्यापीठ पो.स्टेशन | २ लॅपटॉप |
| ०५ | ५२१/२०२३ भादवि कलम ३८० | सिंहगड रोड पो.स्टेशन | १ लॅपटॉप |
| ०६ | २७४/२०२३ भादविकलम ३८० | वारजे माळवाडी पो.स्टेशन | १ सोनीकॅमेरा |
| ०७ | १००/२०२३ भादविकलम ३७९ | महाड शहर पो.स्टेशन जिल्हा रायगड | १ मोपेड |
| ०८ | २२०/२०२३ भादविकलम ३७९ | मानगाव पो.स्टेशन जिल्हा रायगड | १ मोपेड |

सदरची कामगिरी ही मा.पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर, श्री प्रविणकुमार पाटील मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ ०३, श्री.सुहेल शर्मा मा.सहाय्यक पोलीस आयुक्त कोथरुड विभाग,श्री भिमराव टेळे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वारजे माळवाडी पोलीस स्टेशन श्री सुनिल जैतापुरकर व पोलीस निरीक्षक अजय कुलकर्णी (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र मुंढे, रामेश्वर पार्वे,पोलीस अंमलदार प्रदिप शेलार,हनुमंत मासाळ,अमोल राऊत,गोविंद फड,विक्रम खिलारी,विजय भुरुक,बंटी मोरे,श्रीकांत भांगरे,अजय कामठे,अमोल सुतकर,राहुल हंडाळ,नंदकुमार चव्हाण यांनी केली आहे.